# वाकोद विकासाच्या पाऊलखुणा




## जैन चॅरिटीज्‌चे वाकोद ग्रामविकासातील योगदान

पंचवार्षिक आढावा - (१५ ऑगस्ट २००४ ते ३० जुलै २००९)


वाकोद

**आपलं वाकोद**

| | |
|---|---|
| तालुका | : जामनेर |
| जिल्हा | : जळगाव |

संक्षिप्त माहिती (२००१ च्या जनगणनेनुसार)

| | |
|---|---|
| गावाची एकूण लोकसंख्या | : ५१६२ |
| पुरुष | : २६६४ |
| स्त्री | : २४९८ |
| साक्षर | : २७६६ |
| अनु. जाती | : ३९६ |
| अनु. जमाती | : ३६६ |
| गावातील नदी | : वाघूर |
| कृषी क्षेत्र | : कोरडवाहू अधिक प्रमाणात |
| आजच्या उपलब्ध सुविधा | : अंगणवाडी, प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक व बस सुविधा, नळ पाणी पुरवठा. |



आजचे वाकोद गाव शिवार...

# एका नजरेत...


| | | |
|---|---|---|
| ०१. | **प्रस्तावना** | ०२ |
| ०२. | **जैन चॅरिटीज् आणि वाकोद** | ०४ |
| ०३. | **जन्मभूमी विकासाचा ओढा** | ०५ |
| ०४ | **सामाजिक** | |
| | रस्ते, व्यापारी संकुल ओटे, सौर पथदिवे, गटारी, शौचालय बांधकाम इ. | १६ |
| ०५. | **शैक्षणिक** | |
| | अंगणवाडी, प्राथमिक शाळांचा विकास (मराठी व उर्दू ) | २६ |
| | माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळेची विकासकामे | २८ |
| | इ.१० व १२ वी निकालाचा मागील सहा वर्षांचा तुलनात्मक आढावा | ३२ |
| | शाळेची विद्यार्थी संख्या | ३४ |
| | जैन चॅरिटीज्ने केलेली शैक्षणिक मदत | |
| ०९. | **आरोग्य** | |
| | प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीत दिलेले योगदान | ३६ |
| | सन २००४ पासून जैन चॅरिटीज्ने केलेली वैद्यकीय मदत | ३८ |
| १०. | **अतिरिक्त** | |
| | गावातील अतिरिक्त कामे | ४० |
| ११. | **आध्यात्मिक व सांस्कृतिक** | |
| | गावाच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक विकासातील योगदान | ४२ |
| १२. | **ग्राम पंचायत आणि ग्रामस्थांसाठी योगदान** | |
| | ग्रामपंचायतसाठी जैन चॅरिटीज्ने लावलेला हातभार | ४६ |
| | जैन चॅरिटीज्ने गरजूंना केलेली मदत | |
| १३. | **ग्रुप ग्रामपंचायत वाकोद वसूलीचा तुलनात्मक आढावा** | ४८ |
| १४. | **विकासकामांसाठी मंजूर असलेला शासकीय निधी** | ५० |
| १५. | **प्रस्तावित बंधारे** | ५२ |
| १६. | **शेती आणि शेतकऱ्यांचा विकास** | ५४ |
| १७. | **व्यवस्थापकीय खर्च** | ५५ |
| १८. | **सारांश** | ५६ |







साठी उलटली स्वातंत्र्याची भकास ओळख गावांची
सुपूत झिजे उद्धारण्या सरशी वाघूरच्या प्रेमाची !

# प्रस्तावना

स्वातंत्र्याची साठी लोटूनही असंख्य खेड्यातल्या मागासलेपणाचे चित्र मोठे विदारक आहे. ग्राम विकासासाठी सरकारच्या योजना नाहीत, असे नाही. किंबहुना यासाठी बळं देणारे कोणी समाजसुधारक, मार्गदर्शक होऊन गेले नाहीत, असेही नाही. राष्ट्र संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज आदींनी समाज सुधारणेसाठी, ग्रामविकासासाठी दिलेले मंत्रे आजही गावोगावी घुमताहेत. असे असूनही खेड्यातले बकालपण आहे ते तसेच आहे. उलट स्वातंत्र्याच्या साठीनंतर तर यातील पोक्तपणा, शहर आणि खेड्यातील अंतर आणखी वाढताना दिसते आहे. हे गाव, माझे गाव आहे असे समजून आत्मीयता असणारे माणसेही हळूहळू कमी होत चालली आहेत. गावाप्रती आस्था असणारी लोक जर गावात नसतील तर त्या गावाची सुधारणा करणार कशी, असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमिवर काही गावे मात्र सुधारली. जर गावकऱ्यांनी सुधारणा करायच्याच ठरवल्या तर काय होऊ शकत नाही याचे उत्तम दाखले काही ठराविक गावांच्या माध्यमातून पुढे आले आहेत. अशा ठराविक गावांच्या अनुभवावरुन सरकारी यंत्रणेने आपल्या विविध योजनेत बदल केले. या बदलांचा लाभ मात्र सर्वच गावांना घेता आला नाही. लोकसहभागच जर नसेल तर योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यातून काही साध्य होत नाही, हे पुन्हा या निमित्ताने कळून चुकले. लोकांचाच सहभाग नसल्याने ग्रामविकासाचा ताळेबंद प्रत्यक्ष खेड्यात नाही तर सरकारी दप्तरावर उतारला गेल्याची अनेक उदाहरणे देता येतात. सरकार नव्हे तर याला आपण जनताजनार्दन जबाबदार आहोत ही जाणीव होणे महत्त्वाचे ठरते.

अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेले वाकोद अशा असंख्य खेड्यांपैकी एक गाव. या गावाची दुसरी ओळख म्हणजे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांचे हे जन्मगाव. एका साध्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या या कतृर्त्ववान व्यक्तीने उभारलेला उद्योग आज जगावर राज्य करतोय. यशाची सारी शिखरे पार करीत असताना त्यांनी जन्मगावाची नाळं मात्र तुटू दिली नाही. आपण ग्रामिण भागातुन आलेलो असून आपल्या गावाच्या विकासासाठी यथाशक्य योगदान दिले पाहिजे याची जाणीव त्यांनी जळगावला स्थलांतरीत होऊनही कायम ठेवली. सुरुवातीच्या काळात त्यांनी संघटन व जनजागृतीवर भर दिला. परिवर्तनाची गरज ओळखून लोक प्रबोधनावर भर दिला. पायाभूत सुविधा असल्याशिवाय इतर विकास योजना राबवून चालणार नाही, हे नेमकेपणाने त्यांनी ओळखले. त्यांनी सरकारी योजनांचा लाभ गावाला मिळवून देत रस्ते, शौचालय, समाजमंदिर, अंगणवाडी, प्राथमिक-माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केद्र, शेती विकास यावर भर दिला. जन्मगावाची बांधिलकी मानून त्यांनी चॅरिटीज्च्या माध्यमातून तब्बल दोन कोटी २२ लाख ३० हजाराची अतिरिक्त रक्कम या कामासाठी उपलब्ध करून दिली. उद्देश एकच की, उपलब्ध शासकीय निधीत जर चॅरिटीज्च्या माध्यमातून कामे बसवली तर त्याची व्यापकता वाढवता येते. आपल्या गावात होणारी पायाभूत सुविधेची कामे कित्येक वर्षे टिकलीच पाहिजे अशी धारणा गावकऱ्यांत असली पाहिजे. आदरणीय भवरलाल जैन तथा भाऊंनी ही भूमिका घेतल्याने वाकोदमध्ये झालेली पायाभूत कामे आदर्श ठरली आहेत.

आपण जे काही करत आहोत त्याचा लेखाजोखा सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे या उद्देशाने ग्रामसभेत वेळोवेळी संबंधित माहिती सादर करण्याची दक्षता त्यांनी घेतली. चॅरिटीज्च्या माध्यमातून दीर्घकाळ टिकणारी कामे होऊ शकतात याचा प्रत्यय वाकोद विकास प्रकल्पाद्वारे आला. शासकीय योजना व त्यात जैन चॅरिटीज्ची भर, कंत्राटदारांकडे कामे देण्यापेक्षा ग्रामपंचायतीनेच दक्षता घेऊन कामे करणे याचा पाया वाकोद प्रकल्पाद्वारे रचला गेला. वाकोदमध्ये झालेल्या कामाचा पंचवार्षिक आढावा या पुस्तिकेच्या माध्यमातुन उपलब्ध होत आहे. भाऊंचा ग्राम विकासामागे असलेला दृष्टिकोन व उपलब्ध केलेल्या निधीचा योजनानिहाय आढावा या पुस्तिकेत दिला आहे, त्यातून इतरांनाही यातून बरेच काही घेता येईल असा विश्वास वाटतो.





स्नेहभाव, विश्वास आणि आसुसलेल्या नजरा...

# जैन चॅरिटीज् आणि वाकोद

## स्थापना आणि भूमिका

वाकोद हे जळगाव औरंगाबाद मार्गावर अजिंठ्याच्या जवळ असलेले गांव श्री. भवरलालजी जैन यांची या गावातली तसे पाहिले तर तिसरीच पिढी आहे. पाण्याच्या दुर्भिक्षात होरपळून निघालेल्या जैन कुटुंबाने इतरांप्रमाणे राजस्थानातून वाकोदमध्ये स्थलांतर केले. मूळ शेतकरी असलेल्या या कुटुंबाने त्या काळी असलेली वाकोदमधील पाण्याची उपलब्धता लक्षात घेत मातृभूमी सोडण्याचे दुःख हलके करून घेतले. परिस्थितीशी झुंजत या कुटुंबाने वाकोदमध्ये थोडीबहुत शेती जमवली. जेमतेम उपजीविकेचे उत्पन्न शेतीने त्यांना दिले. पाण्याचे चटके व त्यामुळे शेतीची होणारी परवड याचे अनुभव लहानपनापासूनच भाऊंनी घेतले. गावातील प्राथमिक शिक्षणापासून ते आरोग्य सुविधेच्या उणीवेमुळे गावकऱ्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते याचा अनुभव त्यांनी घेतला आहे. मागासलेल्या खेड्यात जर पायाभूत सुविधा नसतील तर लोकांवर काय बितते याचा अनुभव घेत त्या संवेदनांना त्यांनी कायम जपले.

व्यावसायिक जीवनात स्थिरस्थावर झाल्यानंतर खरे पाहता त्यांना पुन्हा गावाकडे परतण्याची गरज नव्हती. परंतु, जन्मगावाप्रती जी कृतज्ञता त्यांनी जपली होती, त्या कृतज्ञतेने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. ज्या गावात आपण वाढलो, घडलो त्या गावासाठी काही करणे ही आपली जबाबदारी आहे या नैतिक भूमिकेतून त्यांनी वाकोद ग्रामविकास प्रकल्पाची रूपरेषा आखली. बदलत्या राजकीय संदर्भानुसार आज खेड्यापाड्यात निर्माण झालेल्या गटबाजी सारख्या प्रकारांपासून वाकोद अपवाद होते असे नाही. या प्रकल्पाची सुरुवातीला भाऊंनी पहिले जर काम कोणते हाती घेतले असेल तर ते गटबाजी थोपविण्याचे! प्रत्येक ग्रामस्थाने जर आपल्या गावाकडे आत्मीयतेने पाहिले तर कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास त्यांनी गावकऱ्यांमध्ये निर्माण केला.

गाव आणि गावकऱ्यांविषयी आपुलकीचे हे गुण त्यांची आई गौराबाई आणि वडील हिरालाल यांच्याकडून घेतले. गावातील आजारी महिलांना होईल तितकी मदत करण्यात गौराबाईंनी कधी मागेपुढे पाहिले नाही. वडील हिरालालजी जैन यांनी वाकोद येथे गावक-यांच्या मदतीने जैन स्थानकाची उभारणी केली होतीच. आई-वडिलांनी जपलेल्या सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी तेवढ्याच समर्थपणे भाऊंनी पुढे जपली. अध्यात्मासाठी सुरु झालेल्या या सामाजिक कार्याला भाऊंनी पुढे अनेक उपक्रमांची जोड दिली. या कार्याला व्याप्ती देण्याच्या उद्देशाने १९९५ साली जैन चॅरिटीज्ची त्यांनी स्थापना केली. या उपक्रमात त्यांचे बालमित्र ना. धों. महानोर सोबतीला! ते ही शेतकरी कुटुंबातलेच. त्यांच्या मैत्रीतील अधिकांश गप्पा साहित्यासमवेत शेतीबाबत, ग्रामविकासाबाबत व्हायच्या. त्यामुळे या सामाजिक कार्यात शेतीचा समावेश न झाला तर, नवलंच.

शेती सुधारली तर गाव सुधारण्यास वेळ लागणार नाही हे ओळखून त्यांनी बांबू, साग, सिताफळ लागवडीचा कृषी आराखडा तयार करून घेतला. शेती विकासाचे प्रयोग त्यांनी स्वतःच्या शेतीवर केले. पाण्याच्या काटकसरीने वापर व्हावा, कमी पाण्यावर जास्तीत जास्त उत्पादन घेता यावे यासाठी जैन इरिगेशनने ठिबक सिंचनपद्धतीचा प्रत्यक्षात वापर करून दाखवला. मोकाट पाण्याच्या वापरामुळे होणारे पाण्याचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना परवडणारी प्लास्टीक पाईपची निर्मिती करण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय हा व्यावसायिक दृष्टिकोनातून नव्हे तर सामाजिक बांधिलकीतूनच घेतला याचा प्रत्यय वाकोदवरुन येतो. ग्रामविकासाची जी संवेदना त्यांनी जपली होती त्याला व्यापक आकार देण्यासाठी जैन चॅरिटीज्ची त्यांनी केलेली मुहूर्तमेढ ही दूरदृष्टीचे प्रतीक मानावे लागेल.

भारतीय राज्य घटनेतील मूलभूत अधिकाराची जपणूक करीत स्वातंत्र्य, समता व बंधुभावाला जपत सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, विज्ञानप्रतिष्ठा या लोकशाहीच्या तत्त्वाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे हे चॅरिटीज्चे प्राथमिक सूत्र ठरवण्यात आले. या प्राथमिक सूत्रातूनच कार्यक्षेत्र ठरले गेले. शिक्षणासाठी गुणवत्तापूर्ण शाळा, महाविद्यालयाची निर्मिती, गुणवंतांना चालना देण्यासाठी पुरस्कार, शिष्यवृत्ती, वसतीगृह, ग्रंथालय, प्रयोगशाळांची निर्मिती, संशोधन, प्रकाशन यावर भर देण्याचा उद्देश यामागे ठेवण्यात आला. आरोग्याच्या दृष्टीने गरजू रूग्णांना मदत, हॉस्पिटलची निर्मिती, सार्वजनिक आरोग्यासाठी जागृती, अपंगांना मदत करण्याचा उद्देशही ठेवण्यात आला आहे. शेती, जलसंधारण, महिला सक्षमीकरण, शिक्षण, लोक संघटन, युवकातील क्रीडागुणांना चालना, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम, ग्रामविकासाच्या पायाभूत योजनांवर भर याला प्राधान्य देण्यात येत आहे.

**जैन चॅरिटीज्**
करुणा.. कल्पना.. कष्ट!



# जन्मभूमी विकासाचा ओढा

*प्रसंग- स्व. राणीदानजी उच्च माध्यमिक विद्यालय, उद्‌घाटन दि. ०५-०९-१९९३, स्व. राणीदानजी उच्च माध्यमिक विद्यालय प्रांगण, वाकोद*

*वाकोद ही भवरलालजींची जन्मभूमी. त्या जन्मभूमिच्या ऋणमोचनाचा विचार त्यांच्या मनात सातत्याने घोळत होता. त्याचा श्रीगणेशा झाला समाज मंदिराच्या उभारणीने, आकार आला राम मंदिर जिर्णोद्धाराच्या निमित्ताने, आणि पुढे माध्यमिक शाळेच्या शुभारंभाने. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' हे जेवढे खरे, तेवढेच ग्रामीण विकासाचे हिरवेगार स्वप्न त्यांच्या मनात सातत्याने तरळत होतेच, म्हणूनच २००५-०७ या काळात त्यांनी वाकोद विकासाच्या ध्यासापोटी तेथे कॉंक्रीटचे रस्ते, सौर पथदिवे, पिण्याचे पाणी, संस्कार केन्द्र, रोजगार निर्मिती अशी अनेकविध सर्वोदयाची कामे नेटाने घडवून आणली. हे कार्य आजही अव्याहत सुरू आहे, सुरूच राहील. आता केवळ विकसित नव्हे तर आदर्श गाव म्हणून पुढे आले आहे.*

*जन्मभूमीच्या विकासाची तळमळ त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली. नुसती तळमळच नव्हे तर याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. ५ सप्टेंबर १९९३ रोजी स्व. राणीदानजी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी भाऊंनी केलेले हे भाषण वाकोद विकासाच्या निर्धाराचे बीजभाषण आहे.*

मंचावर बसलेले मान्यवर, माझ्या आयाबहिणींनो, बन्सीभाऊ, दलूभाऊ आणि गावकरी बंधूंनो!

चांगली कामे करण्यात किती अडचणी येतात याचा अनुभव माझ्यापेक्षा कुलगुरू डॉ. निंबा कृष्ण ठाकरे यांना अधिक आहे. मलासुद्धा तसा अनुभव बऱ्याच वेळा आला. स्वातंत्र्योत्तर काळात

जनतेचे अधिकार कमी आणि अधिकाऱ्यांचे अधिकार जास्त असे पर्व सुरू झाले. त्यामुळे जे नोकर आहेत ते मालक झाले आणि जे मालक आहेत ते नोकर झाले आहेत. आज मला एखादा दवाखाना, शाळा, कॉलेज सुरू करायचे असेल तर शासकीय अधिकाऱ्याकडून परवानगी काढावी लागते. त्यासाठीसुद्धा खुशाली द्यावी लागते, पैसा खर्च करावा लागतो. आपल्या देशात ज्या काही प्रमाणात हे प्रकार सुरू आहेत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या गोष्टीला कुठेतरी पायबंद घालण्यासाठी चांगली नेते, कार्यकर्ते कार्यशील आहेत.

आज शिक्षक दिन आहे. या दिवशी मला माझ्या सर्व गुरुवर्यांची प्रकर्षाने आठवण होत आहे. संपत गुरुजी हे माझे इथले गुरुजी. फार कडक शिस्तीचे होते. थोडे काही चुकले तर बाकावर किंवा जागेवर तास संपेपर्यंत उभे करून ठेवायची शिक्षा करीत असत. इथल्या गावातील चार वर्षाच्या शिक्षणात फक्त एक वेळा मला शिक्षा झाली, त्याचे कारण म्हणजे शाळेत मी दोन मिनिटे उशिरा पोहचलो होतो. मात्र त्या प्रसंगानंतर कुठेही जायचे असेल तर आधी जायचे अंगवळणी पडले. या गुणामुळे जे काही प्राप्त करू शकलो, त्याचे ऋण त्या गुरुजींचे आहे.

मित्रहो, या गावाच्या खूप आठवणी आहेत. या गावात जन्माला आलो, या गावच्या नदीत पोहलो, गल्ली बोळातून हिंडलो. संध्याकाळी कपाशीच्या गाड्यांवर शेतातून घरी यायचो त्या वेळी समाधानाने झोप येत असे. भुरे महाराज नावाचे इथे व्यापारी होते. त्यांच्याकडे शेव-चिवडा, मुरमुरे मिळत होते. त्या चवीची अविट गोडी आजही जिभेवर तशीच रेंगाळत आहे. तेथेच पंढरीदादांची आणि माझी पहिल्यांदा भेट झाली. पंढरीदादांचे भाषण आपण ऐकले. त्यांनी माझी तोंड भरून स्तुती केली. त्यांच्या परीने, त्यांनी लोक प्रबोधनाचे काम केले आहे. मी त्यांचा ऋणी आहे.

माझ्या आईला अंकगणितच काय, पण बाराखडीसुद्धा येत नव्हती. आईची वस्तू मोजायची पद्धत म्हणजे एक वीसी. ती विसाच्या पुढे गेली नाही. वडिलांनी बैल आणि शेत याशिवाय दुसरे काही पाहिले नाही. परंतु तरीही त्यांनी आमच्या कुटुंबात शिक्षणाचा पाया रोवला, तो दलुभाऊंना पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवून! १९४८ साली चवथी नंतर मीही जळगावला शिक्षणासाठी निघून गेलो. पुढील शिक्षणासाठी गावात केवळ व्यवस्थाच नाही तर शाळेची व्यवस्थित इमारतही नाही, ही खंत मात्र तेव्हापासूनच होती.

इथे मोठी शाळा सुरू करावी असे स्वप्न होते, ते पूर्ण झाले. या कामात सहकार्य केल्याबद्दल या संस्थेचे संचालक आणि ग्रामस्थ यांना धन्यवाद! चांगले काम राजकारणामुळे कसे बिघडते याचे चटके तुम्हा-आम्हा सगळ्यांना बसले आहेत. सुदैवाने गावकऱ्यांनी या कामात राजकारण येऊ दिले नाही. त्यामुळे सर्व गावकऱ्यांचे, आयाबहिणींचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

मागच्या वर्षी मी इथे आलो होतो, त्या वेळी मंदिरात मूर्तीच्या स्थापनेचा विषय होता. हे मंदिर आता बांधून पूर्ण झाले आहे. त्या प्रसंगी भावना व्यक्त करताना मी म्हटले होते की, गावात रस्ते, गटारी, आरोग्य किंवा इतर सामाजिक कामे असतील, त्यावेळी गावकऱ्यांनी फक्त सहयोगाचा विचार केला पाहिजे. जे काम कुणीतरी फुकट करून देते त्याची किंमत राहात नाही. सरकारने एवढी कामे केली, तरी सरकारी कामांची किंमत झाली नाही. म्हणून मला असे म्हणायचे आहे की, पूर्ण गावात जर रस्ते करायचे असतील, तर ते काम आपण आपल्या स्वतःच्या हिमतीवर करायला हवे. यासाठी संपूर्ण गावाला मी नम्र विनंती करतो की, ज्या काही मूलभूत गरजा आहेत त्या आपण स्वबळावर पूर्ण करू या.

सबंध गावात एका वेळी रस्ते करणे शक्य नसेल, तर गल्ली-गल्लीतून सुरुवात करू. त्या गल्लीत जी पाच-पन्नास घरे असतील, त्या घरातील सदस्यांनी श्रमदान करावे. जैन फाउण्डेशन इतर हातभार लावण्यास तयार आहे. केवळ रस्ते, गटारी किंवा दवाखान्यासाठीच नव्हे, तर गावाच्या ज्या मूलभूत गरजा आहेत, सबंध समाजासाठी ज्यांचा उपयोग होणार आहे अशा कोणत्याही बाबी असोत, त्या पूर्ण करण्यासाठी आपण सहकार्याचा हात पुढे करावा, हे माझे आपल्याला नम्रतापूर्वक जाहीर आवाहन आहे.

मला असे वाटते की, मी जे म्हणतो आहे त्याचा उपयोग गावकऱ्यांनी करून घेतला, तर गावाच्या विकासाचा मार्ग खुला होईल. आणि तसे घडले तर त्याचे मला समाधान वाटेल. कार्यक्रम आयोजित करणे, मोठमोठ्या व्यक्तींना निमंत्रित करणे आणि भाषण करणे हा माझा स्वभाव नाही. काम करणे हा माझा पिंड आहे.

या गावात माझ्या कुटुंबाला येऊन ९६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या मातीचे, जन्मभूमीचे ऋण आहे. माणसाने जाण्यापूर्वी जे ऋण फेडायचे असते, त्यात मातृभूमीचे ऋण फेडले पाहिजे. कृतज्ञता हा मूळ गुण आहे. त्या गुणामधून इतर गुणांचा जन्म होत असतो. ज्या माणसाच्या अंगी कृतज्ञता आली, त्याच्या अंगी कर्तव्याची जाणीव येते. कर्तव्याची जाणीव ज्याच्यात आली त्या माणसात आदर, नम्रभाव निर्माण होतो. या दृष्टीने माझ्या या जन्मभूमीत, खेड्यात काही तरी ग्रामोपयोगी, समाजोपयोगी भरीव काम करावे याची हृदयापासून इच्छा आहे.

माझ्यावर, माझ्या सगळ्या कुटुंबीयांचे प्रेम राहिले. स्वतःचे व्यक्तिमत्त्व विसरून, व्यक्तिमत्त्वाला पूर्ण वेगळे टाकून, मी जे सांगितले ते त्यांनी केले. यापेक्षा दुसरे काही मी कुणाकडून मागू शकत नाही. जे त्यांनी केले त्यात बन्सीभाऊ, दलूभाऊ यांचा मोठा वाटा आहे. या माझ्या कुटुंबीयांच्या सहकार्याने वाकोद ग्राम विकासाचे काम करण्याचा माझा विचार आहे. अशा कार्यासाठी जैन चॅरिटीज्‌ची स्थापना झालेली आहे. जैन परिवाराची मिळकत ही वाकोद गावातच राहणार आहे. ती मिळकत उचलून कुठे दुसरीकडे नेता येणार नाही. त्यातून ग्रामविकास करायचा मानस आहे. आपण या विधायक कामात भरीव साथ द्या.

जय हिन्द! जय महाराष्ट्र!


जन्मग्राम सुधारण्या द्रष्टा हा निघाला ...



तत्कालिन जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे
मुख्य कार्यकारी अधिकारी व मान्यवरांच्या
उपस्थितीत वाकोदच्या विकासाचा
शुभारंभ (१५ ऑगस्ट २००४)




भाऊंची साथ असता ऊन पावसाची पर्वा कुणाला...



मुख्य रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी भरपावसात पहाणी
करताना, तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांसह भाऊ आणि गावकरी.

कामास प्रत्यक्ष प्रारंभ










मुख्य रस्ता २००४ पूर्वी...



मुख्य रस्ता २००९



छाजेड गल्ली २००५ पूर्वी...



छाजेड गल्ली २००९



मुस्लिम मोहल्ला २००५ पूर्वी...



मुस्लिम मोहल्ला २००९







या दगडातून, या राशीतून उभे राहिले ग्राममंदिर...



# सामाजिक

## रस्ते, व्यापारी संकुल ओटे, सौरऊर्जा पथदिवे व समाजमंदिर, गटारी, शौचालय बांधकाम

## शासनाचे योगदान ३० टक्के, जैन चॅरीटीज्चे योगदान ७० टक्के

काही दशकांपूर्वी लोकसंख्या ही मर्यादित होती. यामुळे गावातील घरे सरळ एका ओळीत जरी नसली तरी रस्त्यावर आक्रमणे नव्हती. काळ बदलला. घरेही पुढे सरकली. रस्त्यावरच आक्रमणे झाल्याने साधी बैलगाडीही जाणे मुश्कील झाले. शिवाय नाली शोषखड्डा नसल्याने घराघरातले पाणी रस्त्यावरच!

यशवंत ग्रामसमृद्धी योजना व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेद्वारे गावातल्या अशा रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरणासाठी असलेल्या योजनेचा लाभ घेण्याचे वाकोद ग्रामपंचायत व जैन चॅरिटीज्ने ठरवले. अतिक्रमणामुळे नागमोडी झालेल्या रस्त्याला सरळ करण्यासाठी रस्त्यावरील घरे पाडण्याशिवाय पर्याय नव्हता. लोक प्रबोधन जर चांगले झाले तरच यातून मार्ग होता. गावाला सिमेंटचा रस्ते तर हवे होते. कोंडी फोडण्यासाठी चॅरिटीज्ने ग्रामसभा बोलावली. भाऊंनी लोकांना आवाहन केले. आश्चर्य म्हणजे लोकांनी स्वतःहून आपले अतिक्रमण करून केलेले बांधकाम पाडले. रस्ता मोकळाच नाही तर सरळ झाला. रस्ता प्रशस्त झाल्याने नळाने पाणी पुरवठा करण्यासाठी पाइप लाईन टाकणे सोयीचे झाले. रस्त्यावर सौर दिवे लावण्याचा चॅरिटीज्ने निर्णय घेतला.

सुवर्ण जयंती ग्रामसमृद्धी योजनेतून ५ व्यापारी संकुल व १२ आठवडी बाजाराच्या ओट्याचे बांधकाम झाले. दलित वस्ती सुधार योजनेतून महिलांसाठी शौचालये बांधली गेली. यात समाज मंदिराचे कामही पूर्ण झाले. या सर्व कामांवर रु.१ कोटी ५८ लाख ५९ हजार ९६७ इतका खर्च आला. यातील ४७ लाख ६० हजार ३२१ रुपये शासकीय निधी तर जैन चॅरिटीज्ने १ कोटी १० लाख ९९ हजार ६४६ रुपयांचा निधी लावला.

| अ. नं. | कामाचे स्वरूप (योजना) | वर्ष | झालेले एकूण काम | मंजूर शासकीय निधी | जैन चॅरिटीज्ने लावलेला निधी | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शासन | जैन चॅरिटीज् |
| १ | वाकोद येथील रस्ते कॉंक्रीटीकरण (अतिरिक्त) | २००४ | ११२९ मीटर | — | ३२,७२,४७२.०० | — | १००% |
| २ | गावात पाईप लाईन करणे (अतिरिक्त) | २००४ | ४५४१ | — | १९.३०.०००.०० | — | १००% |
| ३ | सौरऊर्जा पथदिवे (अतिरिक्त) | २००४ | ११ पथदिवे | — | ४,१०,०००,०० | — | १००% |
| ४ | रस्ते कॉंक्रीटीकरण व गटारी बांधकाम (यशवंत ग्रामसमृद्धी योजना) | २००४ पासून | १५७३ मीटर | ३०,००,०००.०० | १,५६,९०१.०० | ९५.२ % | ४.९८% |
| ५ | रस्ते कॉंक्रीटीकरण (संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना) | २००४ पासुन | ८४७ मीटर | १०,५९,४१९.०० | १,९५,७९४.०० | ८४.४ % | १५.६% |
| ६ | ५ व्यापारी संकुल व १२ बाजार ओटे बांधकाम (सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना) | २००६-०७ | ५ व्यापारी संकुल व १४५ ओटे बांधून पूर्ण | ३,३०,९०२.०० | ३०,८९,०६४.०० | ९.६८ % | ९०.३२% |
| ७ | जांभोळ येथील रस्ते कॉंक्रीटीकरण (अतिरिक्त) | २००८ | ६४५ मिटर | — | १८७०४१५,०० | — | १००% |
| ८ | जांभोळ येथे समाज मंदिर इमारत बांधणे | २००८ | काम पूर्ण | २.००.०००.०० | ९५.०००.०० | ६७.७९% | ३२.२१% |
| ९ | महिलांसाठी शौचालये (दलित वस्ती सुधार योजना) | २००९-१० | निम्मे काम पूर्ण | १,७०,०००.०० | ८०,०००.०० (काम प्रगतीत) | — | — |
| | | | **एकूण** | **४७,६०,३२१.००** | **१,१०,९९,६४६.००** | **३०.०१%** | **६९.९९%** |



देशमुख गल्ली २००६ पूर्वी...



मेन रोड शेजारील गल्ली २००५

आकाराचा प्रारंभ... सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधकाम



देशमुख गल्ली २००६ पूर्वी...









काँक्रीट रस्ते आकार घेताना...










स्वच्छतेच्या रूपानं सुख आले अंगणा...

समृद्धीचे नवे मार्ग...













नव्हे गर्दी, ही तर रोजगाराची निर्मिती...










ही बाजारपेठेची पायाभरणी...

प्रशस्त परिसर बाजारपेठेचा...










आकार बाजार पेठेला रोजगार वाकोदला...

एकूण लाभार्थी (व्यापारी) ४२९





दत्त मंदिर परिसर २००९



सौर पथदिवे २००९



सौर पथदिव्यांनी उजळला आसमंत...
मुख्य रस्ता


भगत गल्ली - शौचालय बांधकाम २००९


खालची गल्ली २००९

स्वच्छतेतून आरोग्याकडे...


नेहरू नगर २००९


स्वच्छता गृह, वाडी शाळा २००९



मराठी शाळा - नवीन वर्गखोली २००९


# शैक्षणिक

## अंगणवाडी व प्राथमिक शाळांचा विकास (मराठी व उर्दू)
## शासनाचे योगदान ७० टक्के जैन चॅरीटीज्चे योगदान ३० टक्के

### (अ) प्राथमिक शिक्षण

विकासाचा मार्ग शिक्षणाने समृद्ध होतो. शिक्षणाची बाराखडी ज्या शाळेतून सुरू होते तेथील परिसर व वर्गखोल्या स्वच्छ असायलाच हव्यात. मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे बांधकाम, शाळेवरील उडालेले पत्रे, दुरुस्ती, अंगणवाडीसाठी लागणारी खेळणी, विद्यार्थ्यांसाठी शाळा परिसरात स्वच्छतागृह आदी कामांवर चॅरिटीज्ने भर दिला. यासाठी उपलब्ध असलेला शासकीय निधी लक्षात घेऊन यात भर टाकण्याचा निर्णय जैन चॅरिटीज्ने घेतला. या कामातून शाळा परिसरच नव्हे, तर विद्यार्थीही खुलले आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या कामांसाठी एकूण १३ लाख ३९ हजार ७६६ इतका खर्च झाला असून यापैकी ४ लाख ९ हजार २६६ रुपयांचा निधी हा जैन चॅरिटीज्ने लावला आहे.

| अ. नं. | कामाचे स्वरुप | वर्ष | झालेला एकूण खर्च | शासनाचे योगदान | जैन चॅरिटीजने लावलेला निधी | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शासन | जैन चॅरिटीज् |
| १ | मराठी वस्ती शाळा बांधकाम | २००८-०९ | ८,४५,०००.०० | ६,१९,८७५.०० | २,२५,१२५.०० | ७३.३५% | २६.६५% |
| २ | मराठी शाळेच्या दोन खोल्यांसाठी पत्रे | २००६-०७ | २०,०००.०० | – | २०,००० | – | १००% |
| ३ | मराठी शाळेची जुनी खोली दुरुस्ती | २००८-०९ | ७,०००.०० | – | ७,०००.०० | – | १००% |
| ४ | मराठी शाळेची नवीन वर्ग खोली बांधकाम | २००८-०९ | ३,४८,०००.०० | २,५०,६२५.०० | ९७,३७५.०० | ७२.२% | २७.९८% |
| ५ | मराठी शाळेच्या नावाचा बोर्ड (आर.सी.सी कॉलम बांधकाम व बोर्ड) | २००८-०९ | १५,०००.०० | – | १५,०००.०० | – | १००% |
| ६ | मराठी व उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह बांधकाम | २००८-०९ | ९०,०००.०० | ६०,०००.०० | ३०,०००.०० | ६६.६६% | ३३.३४% |
| ७ | मराठी शाळेचा ओटा दुरुस्ती व रूंदीकरण | २००८-०९ | ५,०००.०० | – | ५,०००.०० | – | १००% |
| ८ | सहा अंगणवाड्यांसाठी खेळणी | २००८-०९ | ९,७६६.०० | – | ९,७६६.०० | – | १००% |
| | | **एकूण** | **१३,३९,७६६.००** | **९,३०,५००.००** | **४,०९,२६६.००** | **६९.४५%** | **३०.५५%** |



आमुची सुंदर शाळा...

स्व. राणीदानजी जैन माध्यमिक व स्व. कांताबाई जैन उच्च माध्यमिक विद्यालय, वाकोद २००९

# शैक्षणिक

## माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळेची विकासकामे

## शासनाचे योगदान ४ टक्के जैन चॅरीटीज्चे योगदान ९६ टक्के

### (ब) माध्यमिक शिक्षण

पुस्तकी शिक्षणासमवेत संगणक, क्रीडा शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास यावर भर देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. शहरामध्ये या सुविधा विद्यार्थ्यांच्या वाट्याला येत आहेत तथापि ग्रामीण भागातील विद्यार्थी यापासून वंचित राहू नयेत म्हणून चॅरिटीज्ने वाकोदमध्ये यावर भर दिला. पर्यावरणाच्या जागृतीसाठी वृक्षारोपण, लोडशेडींगवर मात करण्यासाठी सौर उर्जेचा वापर, टेस्ट सिरीज, क्रीडांगण व संगणक प्रशिक्षणाचा उपक्रम राबविला. शिक्षकांनाही प्रोत्साहन मिळावे, इतरांच्या अनुभवातून त्यांना शिकता यावे यासाठी त्यांचीही अभ्यास सहल, बाहेरील तज्ज्ञ शिक्षकांचे व्याख्यान आयोजित करणे आदी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. यासाठी १५ ऑगस्ट २००९ अखेरपर्यंत विविध विकास कामांवर व उपक्रमांवर एकूण ४६ लाख ४९ हजार २४१ रुपये खर्च झाले असून पैकी जैन चॅरिटीज्ने ४४ लाख ८१ हजार २४१ रुपयांचा निधी खर्च केला आहे तर शिक्षण संस्थेने यात १ लाख ६८ हजार रुपये योगदान दिले आहे.

| अ. नं. | कामाचे स्वरूप | वर्ष | झालेला एकूण खर्च | संस्थेचे योगदान | जैन चॅरिटीज्ने लावलेला निधी | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | संस्था | जैन चॅरिटीज् |
| १ | वृक्षारोपणासाठी रोपे | २००४ पासून | १५,१३७.०० | – | १५,१३७.०० | – | १००% |
| २ | दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम | २००४-०५ | ५,९०,०००.०० | – | ५,९०,०००.०० | – | १००% |
| ३ | सौर उर्जा दिप संच | २००४-०५ | १४,०००.०० | – | १४,०००.०० | – | १००% |
| ४ | विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व पारितोषिके | २००४ पासून | २८,७००.०० | – | २८,७००.०० | – | १००% |
| ५ | सांस्कृतिक व इतर प्रबोधनपर कार्यक्रम | २००४ पासून | ३,१६८.०० | – | ३,१६८.०० | – | १००% |
| ६ | विद्युत फिटींग | २००४-०५ | १५,०००.०० | – | १५,०००.०० | – | १००% |
| ७ | प्रा. मल्हारा सरांच्या टेस्टसिरीज करीता कागदांचा खर्च | २००५ ते ०८ | ७०,७६०.०० | – | ७०,७६०.०० | – | १००% |
| ८ | क्रिडांगण सपाटीकरण | २००५-०६ | १,३०,०००.०० | – | १,३०,०००.०० | – | १००% |
| ९ | पालक शिबिरांसाठी भोजन | २००५-०६ | ८,०००.०० | – | ८,०००.०० | – | १००% |
| १० | संरक्षक भिंत बांधकाम | २००६ पासून | २५,९९,१२०.०० | – | २५,९९,१२०.०० | – | १००% |
| ११ | ४० विद्यार्थ्यांना भुसावळ येथे संगणक प्रशिक्षण | २००६-०७ | १,२०,०००.०० | – | १,२०,०००.०० | – | १००% |
| १२ | शाळेच्या ओट्याचे बांधकाम | २००६-०७ | ४,०००.०० | – | ४,०००.०० | – | १००% |
| १३ | स्वच्छतागृहे बांधकाम | २००७-०८ | ३०,०००.०० | – | ३०,०००.०० | – | १००% |
| १४ | शालेय पोषण आहार | २००८-०९ | १५,६३४.०० | – | १५,६३४.०० | – | १००% |
| १५ | एस. ओ. ठाकरे प्रश्नसंच व झेरॉक्स | २००८-०९ | ६,५४४.०० | – | ६,५४४.०० | – | १००% |

यादी पुढील पानावर ....

आमुची सुंदर शाळा...

स्व. राणीदानजी जैन माध्यमिक व स्व. कांताबाई जैन उच्च माध्यमिक विद्यालय, वाकोद २००९



# शैक्षणिक

| अ. नं. | कामाचे स्वरूप | वर्ष | झालेला एकूण खर्च | संस्थेचे योगदान | जैन चॅरिटीज्ने लावलेला निधी | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | संस्था | जैन चॅरिटीज् |
| १६ | पिण्याच्या पाण्याची टाकी फिटींग्स वॉशबेसीनसह | २००८-०९ | १,१५,०००.०० | – | १,१५,०००.०० | – | १००% |
| १७ | विहीर खोदाई | २००९-१० | ४२,६००.०० | – | ४२,६००.०० | – | १००% |
| १८ | नव्यानेच इ. ५ वीत आलेल्या विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप | २००९-१० | ३०५.०० | – | ३०५.०० | – | १००% |
| १९ | पी. ई. पाईप | २००९-१० | ४,५००.०० | – | ४,५००.०० | – | १००% |
| २० | ज्यु. कॉलेज शिक्षक मानधन | २००५ ते ०८ | ४,४२,६००.०० | ६०,०००.०० | ३,८२,६००.०० | १३.५५% | ८६.४५% |
| २१ | क्रमिक पुस्तक संच पुरवठा | २००४ ते ०९ | ९०,०००.०० | २०,०००.०० | ७०,०००.०० | २२.२२% | ७७.७८% |
| २२ | विद्यार्थ्यांसाठी १६० बाके | २००४ ते ०९ | ९०,०००.०० | २०,०००.०० | ७०,०००.०० | २२.२२% | ७७.७८% |
| २३ | इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा काळात शेंदुर्णी येथे निवास व भोजन व्यवस्था | २००८-०९ | १४,५७५.०० | ५,०००.०० | ९,५७५.०० | ३४.३०% | ६५.७०% |
| २४ | १० वी व १२ वी च्या शिक्षकांचा लातूर अभ्यास दौरा | २००६-०८ | २०,०००.०० | ८,०००.०० | १२,०००.०० | ४०.००% | ६०.००% |
| २५ | बाहेरील तज्ज्ञ शिक्षकांचे मानधन | २००४ ते ०९ | ६,९००.०० | ३,०००.०० | ३,९००.०० | ४३.४८% | ५६.५२% |
| २६ | ज्युनीअर कॉलेज विद्यार्थी क्षेत्रभेटी | २००५-०६ | २८,०००.०० | १४,०००.०० | ५०.००% | ५०.००% | ५०.००% |
| २७ | मुख्याध्यापक कोल्हापूर अभ्यास दौरा | २००६-०७ | ९,६९८.०० | ८,०००.०० | १,६९८.०० | ८२.४९% | १७.५१% |
| | | एकूण | ४६,४९,२४१.०० | १,६८,०००.०० | ४४,८१,२४१.०० | ०३.६०% | ९६.४०% |


संरक्षक भिंत उभारताना...


प्रशस्त प्रवेशद्वार




इ.१० वीची बॅच गुरूजनांसह २००९



इ.१२ वीची बॅच गुरूजनांसह २००९

# शैक्षणिक

## इ.१० वी इ.१२ वी निकालाचा मागील ६ वर्षांचा तुलनात्मक आढावा.

### (क) माध्यमिक व उच्च माध्यमिक

ग्रामीण भागात शिक्षणाच्या पायाभूत सुविधा असल्या तरी शिक्षणाचा दर्जा चांगला असल्याचे चित्र सहसा सर्वत्र आढळत नाही. याला कारणे काहीही असोत, परंतु घरातले वातावरण तेवढेच महत्त्वाचे ठरते. अक्षरशून्य पालक असलेल्या घरात आज जी काही मुले शिकण्याचा प्रयत्न करतात त्यांचे कौतूक करायला हवे. विद्यार्थ्यांच्या कौतुकासमवेच त्यांच्या मनात शिक्षणाबद्धल आस्था निर्माण करण्यावर जैन चॅरिटीजने सुरुवातीला भर दिला. शाळा खोल्यांचे बांधकाम, शाळेत बसण्यास चांगली सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर त्यांच्यापर्यंत चांगले शिक्षणही पोहोचणे गरजेचे होते. मुळात ग्रामीण भागात असणारा चांगल्या शिक्षकांचा वानवा लक्षात घेवून आहे त्या शिक्षकांसाठी अभ्यास दौरे करण्यात आले.

गणित व इंग्रजीसारख्या विषयांबद्धल विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास वाढण्यासाठी जादा तासांचे नियोजन केले. शाळेनंतरही या विषयांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची व्यवस्था केली. गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शिक्षकांनी पालकांच्या घरी जावून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. इयत्ता ५वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक परीक्षेचे नियोजन करण्यात आले. उत्तरे कशी लिहावीत याचे आकलन विद्यार्थ्यांना यामुळे झाले. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी वर्गाचे आयोजन करण्यात आले. जैन चॅरिटीज् संचलित क्षमता विकास प्रबोधिनी मार्फत सातत्याने सराव परीक्षेवर भर दिला आहे. या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिणाम निश्चितच चांगला झाला. शाळेचा निकाल वाढला. हा प्रकल्प सुरू करण्यापूर्वी म्हणजेच २००४ मध्ये गावातील शाळेचा दहावीचा निकाल होता केवळ १४.८१ ट क्के , तो २००९ मध्ये ९७.१४ टक्क्यांवर पोहोचला आहे. यात संबंधित शिक्षणसंस्थेने व शिक्षकांनीही पुढाकार घेतला. बारावीचा निकालही याच पद्धतीने सुधारला. २००४ साली १५ टक्क्यांच्याच जवळपास होता. २००९ साली बारावीचा निकाल हा ९५.०८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

### इ.१० वी निकालाचा मागील ६ वर्षांचा तुलनात्मक आढावा

प्रकल्पापूर्वी निकालाची टक्केवारी १५.७४

जैन चॅरिटीज्‌ने प्रकल्प हाती घेतल्यानंतर आजची टक्केवारी ९७.१४

| सन | एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण | सरासरी गुणांची टक्केवारी | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|
| २००४ | १०८ | १७ | ५१.४०% | १५.७४% |
| २००५ | ८३ | ४५ | ५५.५६% | ६४.२१% |
